# आंतरराष्ट्रीय संघटना विषयी सविस्तर चर्चा करा

भिन्न भिन्न राष्ट्रांतील शासकीय यंत्रणांनी अगर खाजगी व्यक्तींनी एकत्र येऊन काही विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी स्थापन केलेली स्थायी स्वरूपाची यंत्रणा. परस्परांचे हितसंबंध असणाऱ्या राष्ट्रांनी समान बंधने घालून घेणे स्वहिताच्या दृष्टीने आवश्यक असते. या आवश्यकतेतूनच आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण होत असतात. अशा संघटनांपैकी काहींची व्याप्ती जागतिक असते तर काही प्रादेशिक वा विशिष्ट राष्ट्रांपुरत्याच मर्यादित असतात. संयुक्त राष्ट्रे, जागतिक आरोग्य संघटना या पहिल्या प्रकारच्या संघटना आहेत. तर अमेरिकन राष्ट्रांची संघटना अगर अरब लीग ह्या दुसऱ्या प्रकारच्या संघटना आहेत.

## आंतरराष्ट्रीय संघटनेचे प्रकार

- शासकीय
- अशासकीय

ज्या संघटनात सभासद-राष्ट्रांतील शासनयंत्रणेस प्रतिनिधित्व दिलेले असते. त्या शासकीय; खाजगी व्यक्ती अगर संस्थांना स्वतःच्या अधिकाराने अशा संघटनांत भाग घेता येत नाही. भिन्नभिन्न राष्ट्रांतील व्यक्ती अगर खाजगी संस्था ज्यात सहभागी होऊ शकतात, त्या सर्व संघटना अ-शासकीय समजल्या जातात.

## आंतरराष्ट्रीय संघटना म्हणजे काय ?

" इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन (IO)" हा शब्द सामान्यत: सार्वभौम राज्यांचे सार्वभौम सदस्यत्व असलेल्या आंतरराष्ट्रीय सरकारी संस्था किंवा संस्थांना सुचित करतो. सर्वात प्रमुख IO संयुक्त राष्ट्र संघ आहे. १९१ सदस्य आहेत.

जगभरात ३०० हुन अधिक आंतरराष्ट्रीय संस्था आहेत. युनायटेड नेशन्स (UN) ही सर्वात मोठी आणि सर्वात परिचित आंतरशासकीय संस्था आहे.

## संयुक्त राष्ट्रे (United Nations)

संयुक्त राष्ट्रसंघ किंवा संयुक्त राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय विधी, आंतरराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक विकास, सामाजिक प्रगती, मानवाधिकार या बाबींमध्ये सहकार्य सुलभ करणे आणि विश्वशांती प्राप्त करणे अशी घोषीत उद्दिष्टे असलेली एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाच्या जागी देशा-देशांमधील युद्धे थांबविण्यासाठी आणि संवादासाठी अधिष्ठान पुरविण्याच्या उद्देशाने झाली होती.

स्थापना - २४ ऑक्टोबर, १९४५ सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया

मुख्यालय - न्यु यॉर्क, न्यू यॉर्क, संयुक्त राष्ट्र

संस्थापक - संयुक्त राष्ट्र, भारत युनायटेड किंगडम, ब्राझील, फ्रान्स

पुरस्कार - नोबेल शांतता पारितोषिक

साहाय्यक - संयुक्त राष्ट्रे सुरक्षा परिषद, विश्व स्वास्थ्य संस्था

नामांकने - अकादमी पुरस्कार - सर्वश्रेष्ठ दस्तचित्र लघु विषय

राष्ट्रसंघाची उद्दीष्टे -

- जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करणे
- राष्ट्राराष्ट्रांत मैत्रीचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करणे.
- आंतरराष्ट्रीय प्रश्न युद्धाच्या मार्गाने न सोडविता ते शांततेच्या मार्गाने सोडविणे.
- आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करावे.

2) युनेस्को
UNESCO

United Nations Educational, Scientific and cultural Organization 16 नोव्हेंबर 1945 रोजी स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघाची एक विशेष संस्था आहे. शिक्षण, विज्ञान, व संस्कृतीमधील आंतरराष्ट्रीय सहयोग वाढवून जगामध्ये शांतता व सुव्यवस्था / सुरक्षा कायम करण्याचे कार्य युनेस्को पार पाडते. युनेस्कोचे मुख्यालय पॅरिस येथे असून जगभर 50 पेक्षा अधिक कार्यालय आहेत.

युनेस्कोचे संस्थापक जे महायुद्धाला आले होते. ते राष्ट्रांमध्ये आकार आणि संवाद साधून शांतता, शाश्वत विकास आणि मानवाधिकार प्राप्त करणे हे आहे.

3) युनिसेफ (Unicef)

United Nations children's Emergency fund.

संयुक्त राष्ट्र बाल निधी किंवा युनिसेफ ही संयुक्त राष्ट्रांची एक विशेष संस्था आहे. जगभरातील लहान मुलांना अन्न व आरोग्याची सेवा पुरविणे हे युनिसेफचे ध्येय आहे.

11 डिसेंबर 1946 रोजी युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रन्स इमरजन्सी फंड तयार करण्यात आला आणि दुसऱ्या महायुद्धाच्या धर्तीवर झालेल्या मुलांमध्ये आपत्कालीन अन्न आणि आरोग्य सेवा प्रदान करण्यात आली. बाल कुपोषणाच्या समस्येवर कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबत युनिसेफ अविकसित देशांत कार्यशाळा आयोजित करते.

मुख्यालय - न्यु यॉर्क शहर

भारतातील युनिसेफचे प्रमुख - सुश्री सिंथिया मॅकॅफ्रे यांनी ऑक्टोबर 2022 मध्ये भारतातील UNICEF प्रतिनिधीची भूमीका स्वीकारली.

युनिसेफसाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक गरजू मुलापर्यंत पोहोचणे. मुलांच्या जगण्याच्या भरभराटीच्या आणि त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्याच्या हक्कांचे संरक्षण करणे. 75 वर्षापासून युनिसेफचे ध्येय जगभरातील मुलांच्या गरजांनुसार विकसित झाले आहे.

Date : / /

सार्क -
SAARC - South Asian Association for Regional Cooperation ही दक्षिण आशिया खंडामधील 8 देशांची एक आर्थिक व राजकीय सहयोग संघटना आहे. अमेरिका व चीन खालोखाल सार्क सदस्य राष्ट्रांची एकत्रित अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर असून जगातील लोकसंख्येच्या 21% लोक सार्क क्षेत्रामध्ये राहतात. भारत हा सार्कमधील सर्वात बलाढ्य देश आहे.

स्थापना - 8 डिसेंबर 1985

मुख्यालय - काठमांडू, नेपाळ

सदस्यत्व - 8 सदस्य, 9 निरिक्षक

अधिकृत भाषा - इंग्लिश

सरचिटणीस - अर्जुन बहादुर थापा

सध्या दक्षिण आशियामधील 8 देश सार्कचे सदस्य आहेत. 6 जानेवारी 2006 रोजी सार्क सदस्य राष्ट्रांनी प्रादेशिक व्यापाराला चालना देण्यासाठी दक्षिण आशियाई मुक्त व्यापार कराराची निर्मिती केली.
सार्क संघटनेची कल्पना 1950 च्या दशकात Asian Relations Conference मध्ये मूळ धरू लागली. 1970 च्या दशकात बांग्लादेश, भूतान, भारत, मालदिव, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका आणि अफगाणिस्तान या देशांनी एकत्रपणे व्यापार व सहकार हेतू एका संस्थेची गरज भासू लागली.

Page No. :
Date : / /

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना -

आय एल ओ इन ॲक्शन ग्लोबलायझेशन ऑफ ए युरोपियन ऑर्गनायझेशन . बायबिलीयोग्राफी सार्वत्रिक शांतता "सामाजिक न्यायावर आधारित असेल तरच प्रस्थापित होऊ शकते." 28 जून 1919 रोजी स्वाक्षरी केलेल्या व्हर्साय शांतता कराराच्या भाग XIII च्या प्रस्तावनेत आढळणारे हे तत्त्व होते. ज्यावर आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) ची स्थापना झाली.
ILO प्रथमतः राष्ट्रसंघाशी संबंधित एक स्वतंत्र संस्था. द्वितीय विश्वयुद्धाच्या समाप्तीपासून संयुक्त राष्ट्रांमध्ये एक विशेष संस्था आहे.
एकोणिसाव्या शतकात प्रामुख्याने सामाजिक सुधारणा आणि समाजवादी चळवळींमध्ये हळूहळू निर्माण झालेल्या कामगार पद्धतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय नियमांच्या आवश्यकतेची मान्यता. पहिली आंतरराष्ट्रीय परिषद 1890 मध्ये कैसर विल्यम II (1888-1918) यांच्या निमंत्रणावरून बर्लिन येथे झाली. आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे नियम न बदलता कामगारांसाठी परिस्थिती सुधारून सामाजिक शांतता जपण्याचा उद्देश होता. इंटरनॅशनल असोसिएशन फॉर द लीगल प्रोटेक्शन ऑफ वर्कर्स ज्याची स्थापना 1901 मध्ये झाली. त्यांनी त्या उद्दिष्टांचा पाठपुरावा केला आणि संस्थात्मक केले. त्यांच्या कामातून 1901 मध्ये बासेलमध्ये आंतरराष्ट्रीय कामगार कार्यालयाची स्थापना झाली. या एजन्सीने समर्पक सामाजिक कायद्यांचे पहिले संकलन प्रकाशित केले. एक मिशन ज्याचा ILO आज पाठपुरावा करत आहे.

जागतिक व्यापार संघटना ही एक आंतरराष्ट्रीय संघटना जगामधील देशांदरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर देखरेखीचे काम करते. सदस्य राष्ट्रांमधील वाणिज्याला चालना देणे. तंट्यांचे निवारण करणे इत्यादी जागतिक व्यापार संघटनेची प्रमुख कामे आहेत. जकाती व व्यापारासंबंधीचा सर्वसाधारण करार विकसित देशांचे हितसंबंध टिकविणारा असल्यामुळे विकसनशील देशांनी अनेकवेळा आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न केला. मात्र विकसित देशांनी ते सर्व प्रयत्न म्हणून पाडले. संयुक्त राष्ट्रसंघाने 1963 मध्ये संस्थात्मक रचना उभारण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. या समितीच्या सल्ल्यानुसार 1964 मध्ये यु. एन सी टी ए डी (युनायटेड नेशन कॉन्फरन्स ऑन ट्रेड आणि डेव्हलपमेंट) संस्था उभारण्यात आली. उरुग्वे राउंडच्या मराकेश करारानुसार 1 जानेवारी 1995 ला जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. 29 जुलै 2016 अखेर भारतासह जगातील 164 देश ह्या संघटनेचे सदस्य होते. तर 25 देशांनी सदस्यत्व मिळवण्यासाठी उत्सुकता दाखवली आहे. सध्या 15 देश डब्ल्यू. टी. ओ. चे सदस्य किंवा निरिक्षक नाहीत.

व्यापार संघटना -

स्थापना - 1 जानेवारी 1995

मुख्यालय - जिनिव्हा, स्वित्झर्लंड

सदस्यत्व - 164 सदस्य राष्ट्रे

अधिकृत भाषा - इंग्लिश, फ्रेंच, स्पॅनिश

कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स - ज्याला सहसा कॉमनवेल्थ म्हणून संबोधले जाते. ही 56 सदस्य राष्ट्रांची आंतरराष्ट्रीय संघटना आहे. ज्यातील बहुतांश ब्रिटिश साम्राज्याचे पूर्वीचे प्रदेश आहेत. संस्थेच्या मुख्य संस्था म्हणजे राष्ट्रकुल सचिवालय, जे आंतरसरकारी पैलूंवर लक्ष केंद्रीत करते आणि राष्ट्रकुल फाउंडेशन, जे सदस्य राष्ट्रांमधील गैर-सरकारी संबंधावर लक्ष केंद्रित करते.
कॉमनवेल्थ हे 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिश साम्राज्याच्या उपनिवेशीकरणासह त्याच्या प्रदेशांच्या वाढीव स्व-शासनाद्वारे परत येते.
कॉमनवेल्थचे प्रमुख चार्ल्स तिसरे आहेत. तो 15 सदस्य राज्यांचा राजा आहे. ज्यांना कॉमनवेल्थ क्षेत्र म्हणून ओळखले जाते. तर इतर 36 सदस्य प्रजासत्ताक आहेत आणि इतर पाच देशांचे वेगवेगळे सम्राट आहेत.

सदस्य राष्ट्रांचे एकमेकांशी कोणतेही कायदेशीर बंधन नसते परंतु ते त्यांच्या इंग्जी भाषेच्या वापराद्वारे आणि ऐतिहासिक संबंधाद्वारे जोडलेले असतात. कॉमनवेल्थ देशाचे नागरिकत्व काही सदस्य देशांमध्ये, विशेषतः युनायटेड किंगडममध्ये फायदे होते.

| संघटना | स्थापना | मुख्यालय |
|---|---|---|
| संयुक्त राष्ट्र संघ | 1945 | न्यूयॉर्क (अमेरिका) |
| युनेस्को (UNESCO) | 1946 | पॅरिस (फ्रान्स) |
| आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) | 1919 | जिनिव्हा (स्वित्झर्लंड) |
| अन्न आणि कृषी संघटना (FAO) | 1943 | रोम (इटली) |
| आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) | 1948 | वॉशिंग्टन (अमेरिका) |
| आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संघटना (IAEA) | 1957 | व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) |
| आंतरराष्ट्रीय हवामान -॥॥ (WMO) | 1950 | जिनिव्हा (स्वित्झर्लंड) |
| युनिसेफ (UNICEF) | 1946 | - |
| राष्ट्रकुल (CHOGAM) | 1946 | लंडन (ब्रिटन) |
| इंटरपोल (INTERPOL) | 1923 | लिओन (फ्रान्स) |
| रेडक्रॉस | 1963 | जिनिव्हा (स्वित्झर्लंड) |
| जागतिक बँक (IBRD) | 1946 | वॉशिंग्टन (अमेरिका) |
| आशियाई विकास बँक | 1966 | मनीला (फिलिपिन्स) |
| जागतिक न्यायालय | 1945 | हेग (नेदरलँडस) |
| सार्क | 1985 | काठमांडू (नेपाळ) |
| नाम (अलिप्त राष्ट्र | 1961 | बेलग्रेड (सर्बिया) |
| आशियान | 1967 | जकार्ता (इंडोनेशिया) |
| जागतिक व्यापार संघटना | 1995 | जिनिव्हा (स्वित्झर्लंड) |
| जागतिक आरोग्य संघटना | 1948 | जिनिव्हा (स्वित्झर्लंड) |